**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल**

**अपिल क्रमांक : के.आर-३९/२०२१**

**अपिलार्थी, श्री. भिष्म भट्ट**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,**
ग्रामपंचायत कार्यालय सासवने,
मु.पो.सासवणे, ता.अलिबाग, जि.रायगड ४०२ २०८

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी,**
पंचायत समिती कार्यालय अलिबाग,
ता.अलिबाग, जि.रायगड ४०२ २०१

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : १८.५.२०२२**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १२.१०.२०२० | ३.११.२०२० | १७.११.२०२० | ---- |

अपीलार्थी यांनी आयोगाकडे दि.६.१.२०२१ रोजीच्या अर्जान्वये द्वितीय अपिल दाखल केले आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक १८.५.२०२२ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी तसेच तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी आणि तत्कालीन व विद्यमान प्रथम अपिलिय प्राधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणी दरम्यान नमूद केले की, त्यांच्या दिनांक १२.१०.२०२० रोजीच्या माहिती अर्जान्वये, "*Meter Installation and Work Details Report Copies on my land.*" अशा प्रकारची माहिती मागीतली होती. सदर माहिती त्यांना मिळालेली नाही. यास्तव द्वितीय अपिल दाखल केले आहे.

तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी असे सादर केले की, त्यांनी दिनांक ३.११.२०२० रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना, "सदरचा अर्ज हा इंग्रजीत आहे. तरी ग्रामपंचायतीचे कामकाज हे मराठी भाषेत चालते त्यामुळे आपण मराठीत अर्ज सादर करावा. जेणेकरून आम्हाला सदर अर्जाचे उत्तर देणे सोईचे जाईल." असे कळविले आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच उभयपक्षांचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षाला येत आहे की, सकृतदर्शनी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाला अनुसरून उपलब्ध माहिती दिलेली नाही. सबब, विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आता अपिलार्थीस घरपट्टी आकारणी संबंधी जे कागपत्र त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असतील त्याची प्रत पुरविणे उचित होईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत सासवणे यांनी **अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाला अनुसरून, घरपट्टी आकारणी संबंधी जे कागदपत्र त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असतील त्याची प्रत १५ दिवसात समक्ष/ नोंदणीकृत टपालाने निःशुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. उपरोक्त निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १८ मे, २०२२

(सुनील पोरवाल)
राज्य माहिती आयुक्त,
कोंकण खंडपीठ